**औरंगाबाद जिल्ह्यामधील सिल्लोड तालुक्यातील (भवन, केरळा, चिंचखेडा, धानोरा, मोढा खुर्द, काटनांद्रा, सिसारखेडा) वैजापूर तालुक्यातील (अव्वलगाव, जळगांव, बाभुळगांव गंगा, भालगांव), फुलंब्री तालुक्यातील (वानेगावं खु, बु २) व पैठण तालुक्यातील (हिरडपुरी, घारेगांव) या चार तालुक्यामधील १४ रेती घाटांची दि. २६.११.२०२१ रोजी आयोजित केलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्त.....**

…………..

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून औरंगाबाद जिल्ह्यातील पाच (०४) तालुक्यांमधील १४ रेती घाटांचे प्रस्ताव जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी प्राप्त झाले असून जाहीर लोक सुनावणीसाठी प्राप्त झालेल्या रेती / वाळू घाट बाबत माहिती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे :-

| **रेती / वाळू घाटाचे नाव** | **तालुक्यांमधील वाळू / रेती घाटांची संख्या** | **तालुका** |
|---|---|---|
| भवन, केऱ्हाळा, चिंचखेडा, धानोरा, मोढा खुर्द, कोटनांद्रा व सीसारखेडा | ०७ | ता. सिल्लोड |
| अव्वलगाव, जळगाव, बाभुळगांव गंगा व भालगाव | ०४ | ता. वैजापूर |
| वानेगाव खु. बु. २ | ०१ | ता. फुलंब्री |
| हिरडपुरी व घारेगांव | ०२ | ता. पैठण |
| | एकूण = १४ | |

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (म.प्र.नि. मंडळ) यांचेकडून प्रस्तावित लोक सुनावणी संदर्भातील कार्यालयीन आदेश क्र. – E-106 /2021 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-211103-FTS-0125 दिनांक 03.11.2021 रोजी प्राप्त झालेला आहे. सदर कार्यालयीन आदेशास अनुसरून लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आलेली आहे. **(<u>सहपत्र -१</u>).**

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. अनंत गव्हाणे,<br>अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | मा. अध्यक्ष<br>लोक सुनावणी समिती |
| २) | डॉ. प्रवीण जोशी,<br>प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | मा. सदस्य<br>लोक सुनावणी समिती |
| ३) | श्री. प्रदीप वानखेडे,<br>उप- प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | समन्वयक<br>लोक सुनावणी समिती |

श्री. प्रदीप वानखेडे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, (म.प्र.नि. मंडळ) औरंगाबाद तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहीर लोक सुनावणी समिती, औरंगाबाद यांनी सदरच्या (आजच्या) पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष श्री. डॉ. अनंत गव्हाणे, अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद उपस्थित असलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद येथील प्रादेशिक अधिकारी, डॉ. प्रवीण जोशी, सदस्य, लोक सुनावणी समिती तसेच सदर लोक सुनावणीचे अर्जदार व जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद श्री. किशोर घोडके व उपस्थित असलेले सिल्लोड,, वैजापूर, फुलंब्री आणि पैठण या ०४ तालुक्यांचे सरपंच, ग्राम सेवक इतर सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले NGO चे सदस्य तथा सर्व संबंधित नागरिकांचे पर्यावरण विषयक लोक सुनावणीमध्ये स्वागत केले तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीला सुरुवात करण्यात आली. सर्व प्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सूचित केले कि, भारत सरकारच्या वने व पर्यावरण तथा हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४.०९.२००६ व सुधारित दिनांक ०१.१२.२००९ रोजीच्या तसेच इतर अधिसूचनेनुसार विशीष्ठ प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती / अनुमती (Environment Clearance) घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी (Public Hearing) आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

केंद्रीय पर्यावरण मंत्रालय / पर्यावरण वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांच्या १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमाद्वारे व त्यांमधील त्यानंतरच्या सुधारणांच्या अनुषंगाने सदरील लोक सुनावणी आज आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील अधिनियमांद्वारे नदी पात्रांमधील वाळू उपसा करण्यासाठी संबंधित राज्य पर्यावरण मंत्रालय यांची पर्यावरण विषयक अनुमती (Environmental Clearance) / परवानगी प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे. त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणून पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी आज रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद यांचा औरंगाबाद जिल्ह्यामधील ४ तालुक्यांमधील १४ वाळू घाटांबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठीचा अर्ज व त्यासोबतचे कागदपत्रे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद कार्यालयाकडे दिनांक १८/१०/२०२१ च्या पत्राद्वारे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्याबाबत अर्ज प्राप्त झालेला होता.

समन्वयक, लोक सुनावणी समिती यांनी कळविले कि, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेला प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम बाबत इत्यंभूत माहिती सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे तसेच प्रस्तावित प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा व त्या संबंधातील कायदे या बाबतची माहिती सामान्य जनतेस देण्यात येऊन जनतेमार्फत दिलेल्या सूचनांचा विचार करणे हा होय.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त लोक सुनावणी घेण्याबाबतचा अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचा परवानगीने दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी औरंगाबाद जिल्ह्यामधील १४ रेती / वाळू घाटांची पर्यावरणविषयक लोक सुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आली होती. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर १४ वाळू घाटांच्या जाहीर लोक सुनावणीची सूचना दि. २६.१०.२०२१ रोजीच्या मराठी वर्तमानपत्र " दैनिक सकाळ" व इंग्रजी वर्तमानपत्र "द टाइम्स ऑफ इंडिया" मध्ये प्रकाशित / प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरील वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील १४ रेती / वाळू घाटांकरिता पर्यावरणविषयक जाहीर लोक सुनावणी सकाळी ११.०० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे आयोजित केलेली असल्याबाबत सविस्तर वृत्त / सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयामार्फत जाहीर लोक सुनावणीशी संबंधित प्रति (scan copies) ई मेल द्वारे तसेच छापील प्रति व्यक्तिश संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांकडे, मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाकडे, संबंधित तहसील कार्यालय, संबंधित गट विकास अधिकारी कार्यालय, मा. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम

मध्य विभाग, तळ मजला, पूर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिविल लाइन्स, नागपूर. तसेच जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व ठिकाणी जाहिरातीपूर्वीच छापील प्रति (hard copies), तसेच ई मेल द्वारे (scan copies) प्रति पाठविण्यात आल्या आहेत. म. प्र. नि. मंडळ (mpcb.gov.in) व जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्या संकेतस्थळ (website) वर सुद्धा स्कॅन प्रति प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या.

ई मेल द्वारे पाठविलेल्या तसेच प्रत्यक्ष शासकीय कार्यालयांमध्ये पोहोच केलेल्या दस्तऐवजांमध्ये पर्यावरणीय आघात मूल्यांकन अहवाल (मराठी व इंग्रजी) कार्यकारिणी सारांश (मराठी व इंग्रजी), Prefeasibility Report, Consolidated Statement व इतर कागदपत्रे लोकांच्या माहितीसाठी / अध्ययनासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. अधिसूचनेप्रमाणे रेती / वाळू घाटांसंबंधीचे ठळक वैशिष्ट्ये असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रति मराठी व इंग्रजी भाषेमध्ये शासनाच्या खालील कार्यालयामध्ये इच्छुक नागरिकांना अभ्यास / अध्ययनासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या:-

१. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
२. जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.
३. जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद
४. जिल्हा परिषद, औरंगाबाद
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिल्लोड/वैजापूर/फुलंब्री/पैठण जि. औरंगाबाद.
६.गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,सिल्लोड/वैजापूर/फुलंब्री/पैठण जि. औरंगाबाद
७. ग्रामपंचायत कार्यालय, भवन, केरळा, चिंचखेडा, धानोरा, मोढा खुर्द, काटनांद्रा, सिसारखेडा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद.
८. ग्रामपंचायत कार्यालय, अव्वलगाव, जळगांव, बाभुळगांव गंगा, भालगांव, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद
९. ग्रामपंचायत कार्यालय, वानेगावं खु, बु २, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, हिरडपुरी, घारेगांव, ता. पैठण, जि. औरंगाबाद.
११. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्लॉट न. ए-४/१, एमआयडीसी, चिकलठाणा, औरंगाबाद.
१२. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट न. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा औरंगाबाद.
१३ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१४. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५.प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

उप प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद यांनी दि. २६.११.२०२१ रोजी स. ११.०० वाजता मा. अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती, लोकसुनावणीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोक सुनावणीला सुरुवात केली. जाहीर लोक सुनावणीवेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी **(सहपत्र-२)** नुसार सोबत जोडली आहे.

प्रकल्प प्रवर्तक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांचे तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांना औरंगाबाद जिल्ह्यामधील प्रस्तावित १४ वाळू / रेती घाट साठीच्या लोकसुनावणीबाबत पर्यावरण विषयी बाबींच्या अनुसरून संपूर्ण मुद्देसूद सादरीकरण करण्यास आमंत्रित केले. सदरील लोक सुनावणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी M/s. Enviro Techno Consult Pvt. Ltd., 68, Mahakali Nagar-2, Near Manewada Square, Nagpur यांना नियुक्त केले आहे. M/s. Enviro Techno Consult Pvt. Ltd., Nagpur मध्ये कार्यरत श्री. डॉ. आशिष शुक्ला व श्री. डॉ. प्रशिक शुक्ला, तांत्रिक प्रतिनिधी यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक बाबींच्या अनुसरून सादरीकरण उपस्थित असलेल्या जनतेपुढे मांडले.

**तांत्रिक सल्लागार यांचेकडून खालील रेती / वाळू घाट बाबत पर्यावरण विषयक बाबींच्या अनुसरून माहिती देण्यात आली (तक्ता) :-**

१. <u>ता. सिल्लोड :-</u>

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | भवन लगतचे गट क्र. २००,२०१, २०३, २०६, २०७, २०८, २२१, २२२, २३१, २३२, २३३, २३४, २३७ व १९० | १.२० | ४२४० |
| ०२ | केऱ्हाळा लगतचे गट क्र. ५५४, ५५५, ५५६, ५५७, ५५८, ५५९, ५७२, ५७४ व ५७५ | १.०२ | ३६०४ |
| ०३ | चिंचखेडा लगतचे गट क्र. २१, २२, ३४, ३५, ३६ | १.०० | २४७३ |
| ०४ | धानोरा लगतचे गट क्र. ५४/१, ५४/२, ६०/१, ६०/२, ६१/२, ६२, ६३, ६४, ६५, ६६ व ७१ | १.२० | ५०८८ |
| ०५ | मोढा खुर्द लगतचे गट क्र. ६२, ६३, ६८, ७० ,७१ व ७२ | १.२० | २१२० |
| ०६ | कोटनांद्रा लगतचे गट क्र. १३८, १४०, १४२ व १४३ | १.०४ | ३२९२ |
| ०७ | सीसारखेडा लगतचे गट क्र. १००, १०१, १११, ११२, ११३, ११४ व ११५ | १.०५ | ३७१० |

०२. **ता. वैजापूर:-**

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | अव्वलगाव, लगतचे गट क्र. १३६, १३९ व १४० | १.०० | ३५३४ |
| ०२ | जळगाव, लगतचे गट क्र.५३, ५४, ५५, ५७, ५९ व ७५ | १.०० | ३५३३ |
| ०३ | बाभुळगांव गंगा, लगतचे गट क्र.१४०, १४१, १४२, १४३, १४७ व १४८ | ४.५० | ३१८०२ |
| ०४ | भालगाव लगतचे गट क्र. ५, ६, ७ व १२० | १.०५ | ३७१० |

०३. **ता. फुलंब्री:-**

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | वानेगाव खु. बु. २ लगतचे गट क्र. १८, १९, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १७७, १७८, १७९, १८०, १८१, १८२, १८३ व १८४ | १.६० | ३९५८ |

०४. **ता. पैठण:-**

| अनु. क्र. | वाळू घाटाचे नाव | वाळू घाटाचे क्षेत्र (Hector) | उपलब्ध अंदाजे वाळू साठा (ब्रास मध्ये) (Brass) |
|---|---|---|---|
| ०१ | हिरडपुरी लगतचे गट क्र. १९१ व १९२ | ४.९० | २५१०६ |
| ०२ | घारेगांव लगतचे गट क्र. २, ४, १११, ११२ व ११५ | १.०५ | २९६८ |

मा. अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद व समिती अध्यक्ष, लोक सुनावणी समिती यांनी जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपद्धती उपस्थितांना समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी (आज होत असलेल्या जाहीर लोक सुनावणीवेळी) पर्यावरणविषयक परवानगी प्रदान (issue) बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणी दरम्यान घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन शासनास पाठविण्यात येईल व त्यास अनुसरून संबंधित शासन विभागाकडे (पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र

शासन, मंत्रालय, मुंबई) या सर्व बाबी पर्यावरण विषयक अनुमती प्रदान करताना विचारात घेण्यात येतील. त्यामुळे, उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टीका, टिपण्णी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडण्याबाबत उपस्थितांना विनंती केली. या सर्व बाबींची नोंद घेतली जाईल व महाराष्ट्र शासनामधील संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी (पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई) पाठविण्यात येईल असे कळविले.

डॉ. श्री. आशिष शुक्ला व डॉ. श्री. प्रशिक शुक्ला, तांत्रिक सल्लागार, Enviro Techno Consult Pvt. Ltd., Nagpur यांनी सर्व १४ रेती / वाळू घाटांचे पर्यावरण विषयक बाबींच्या अनुसरून सादरीकरण (Presentation) केले.

सादरीकरणानंतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना या रेती / वाळू घाट बाबत त्यांचे मत, टीका-टिपण्णी, आक्षेप, सूचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबत एकही लेखी निवेदने प्राप्त झाले नसल्याचे कळविले.

लोक सुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिपण्णी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प धारकाने (जिल्हा खनिकर्म अधिकारी) / तांत्रिक सल्लागार ( जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी नियुक्त केलेले) यांनी दिलेली उत्तरे / आश्वासने खालील प्रमाणे आहेत:-

डॉ. श्री. अनंत गव्हाणे, मा. अध्यक्ष, लोकसुनावणी समिती व श्री. प्रदिप वानखेडे, समन्वयक यांनी सर्व संबंधितांना प्रश्न, आक्षेप, सूचना, तक्रारी असल्यास निदर्शनास आणून द्याव्या असे कळविले

| **अनु. क्र.** | **आक्षेप / प्रश्न / सूचना** | **चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / तांत्रिक सल्लागार / मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे / अभिप्राय** |
|---|---|---|
| १ | संतोष दादासाहेब भंगाळे, सरपंच बाभुळगांव गंगा<br>अ) रस्ते खराब झाले नाही पाहिजे | अ) मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, शासनाचा लिलाव असल्यामुळे यात शासनाचा फायदा होतो व त्यातुन ग्रामपंचायतला विशिष्ट निधी शासनाच्या नियमाप्रमाणे मिळत असतो. यात गावाचा फायदा |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. सदर निधी कुठे वापरायचा तो गावाने ठरावयाचा. यामुधन गावाला रस्ता व इतर कामे करता येईल.<br>वाळू घाटाचे लिलाव होणार असल्याने व ते वाळू घाट तुमच्या गावात असल्याने तुम्हाला तुमच्या गावाच्या दृष्टीने काही सूचना मांडवयाच्या असता त्याची संधी तुम्हाला ब-याच वेळा मिळत नाही. लोकांच्या निगडीत काही प्रश्न असतात ते मांडण्याची संधी आहे व त्यावर काही उपाययोजना व तो प्रश्न कसा सोडवयाचा यासाठी जाहीर सूचना देउन सदर लोक सुनावणी घेण्यात येत आहे. त्यामुळे कृपया आपल्या सूचना मांडव्यात. |
| | ब) वाळू घाटावर मजुरांची संख्या जास्त असल्याने कोव्हीडचे प्रमाण वाढू शकते ? | ब) वाळू घाटावर काम करत असताना शासनाच्या कोव्हीड-१९ अंतर्गत सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन केले जाईल जसे मास्कचा वापर बंधनकारक, सॅनीटायजरचा वापर व लसीकरण झालेल्या मजुरांनाच कामावर ठेवले जाईल. आपल्या भागात कोव्हीडचे प्रमाण कमी होत आहे तरी माझी सर्वांना विनंती असेल की सर्वाने लसीकरण करणे गरजेचे आहे. |
| | क) माझ्या गावात ९८ टक्के लसीकरण झाले आहे. | क) मा. अध्यक्षांनी यावर अभिनंदन व्यक्त केले. |
| २ | श्री. दत्ता कुडके, के-हाळा, सिल्लोड<br>अ) वाळू घाटांपर्यंत जाण्याकरिता रस्ते झाले पाहिजेत ? वाळू घाटाचा गावाला काहीही फायदा नाही. | अ) मा. अध्यक्षांनी यावर सांगितले की, वाळू घाटाच्या लिलावास गावाने प्रतिसाद दयावा. लिलावाकडे एक व्यवसाय म्हणून लोक बघतात. या पध्दतीने याकडे बघितले तर घेणा-यास व गावास याचा फायदा होईल. जर लिलाव झाला तर गावाला पैसे मिळतील व मिळालेल्या पैश्यातुन खराब रस्ते नवीन होतील. |
| | ब) लिलावाची किंमत जास्त असल्याने आम्हाला त्यात भाग घेणे शक्य नाही. त्यामुळे प्रशासनास अशी विनंती करतो की त्यांनी लिलावाची किंमत कमी करावी, जेणेकरुन लिलाव होईल व गावाचा फायदा होईल व शासनाच्या खात्यात पैसे जमा होईल. | ब) मा. अध्यक्षांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना लिलावाची किंमत कशी ठरवतात याची माहिती देण्यास सांगितले. जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी वाळू घाटाची अपसेट किंमत ठरविण्यासाठी मागील लिलावातील सरासरी घेण्यात येते. त्याची प्रती ब्रास काढून प्रत्येक वाळू घाटाची किंमत ठरवली जाते. तसेच किती वाळू साठा आहे त्याची सरासरी घेउन किंमत ठरवली जाते उदा. के-हाळा गावामध्य ३६०० ब्रास वाळू आहे. त्यानुसार त्याची अपसेट किंमत रु. ६८ लक्ष होईल.<br>यावर मा. अध्यक्षांनी असे नमुद केले की, आपल्या वाळू पट्टयात ३६०० ब्रास वाळू असुन एका टॅक्ट्रर मध्य |

| | | |
|---|---|---|
| | क) सर २३८६२ ब्रास हा आकडा मोठा आहे लिलाव झाला नाही तर पुढे काय ?<br><br>ड) ठरविलेल्या किंमतीत लिलाव झाला नाही तर काय ?<br><br>इ) आमच्या गावाचा लिलाव न झाल्याने अवैध वाळू चोरी होते. यावर महसुल प्रशासनाने बारीक लक्ष दिले तर फरक पडेल.<br><br>ई) आमच्या गावचा लिलाव झाला पाहिजे असे बघावे. | एक ब्रास वाळू बसते म्हणजे साधारणत: ३६०० टॅक्ट्रर इतकी वाळू आहे. म्हणून तेवढी किंमत ठेवली आहे. वाळू घाटांचा लिलाव झाला नाही तर वाळू वाढत जाते त्यामुळे किंमत देखील वाढते.<br>क) मा. अध्यक्षांनी नमुद केले की, लिलाव होईल त्यास इतर जिल्हयातील लोक येतात व स्थानिक लोक सुध्दा एकत्र येउन भाग घेउ शकतात किंमत ही एकसुत्री ठरविली जाते कमी जास्त करण्याचे अधिकार कोणालाही नाही.<br>ड) यावर प्रकल्प प्रतिनीधी डॉ. शुक्ला यांनी सांगितले की शासन निर्णयानुसार तीन टप्प्यात लिलाव होतात व लिलावाची बोली न झालस चौथ्या टप्प्यात अपसेट किंमत २५% कमी होते.<br>इ) जोपर्यंत लिलाव होत नाही तोपर्यंत आठवडयाला पथक गेले पाहीजे. शासनाने गावस्तरावर ग्रामदक्षता समिती स्थापन केलेली आहे. सदर समितीने या प्रकरणी कारवाई करुन जिल्हास्तरावर कळविले पाहिजे जेणेकरुन नियमाप्रमाणे उचित कारवाई करता येईल.<br>ई) मा. अध्यक्ष यांनी लिलावाची प्रक्रियेची विस्तृत माहिती दिली. |
| ३ | श्री. गोरख मोडके, साहजदपुर<br>अ) वाळूची चोरटी वाहतुक जास्ती चालु असुन लोकांना धमकावले जाते पोलीस पाटील यांना पत्र दयावे. | अ) मा. अध्यक्ष यांनी पोलीस पाटील यांना पत्र दयावे असे सांगितले. |
| ४ | श्री. सुधाकर भालेराव, आडगांव<br>अ) ओव्हरलोडींग बाबत बंधन आणावे जेणेकरुन अपघात व रस्ते खराब होणार नाहीत. | अ) प्रकल्प प्रतिनिधी डॉ. शुक्ला यांनी असे सांगितले की, वाळू वाहतुकीसाठी फक्त ट्रॅक्टरला परवानगी आहे व एका ट्रॅक्टरची क्षमता ०१ ब्रास आहे. तसेच धुळ उडू नये म्हणून पाण्याची फवारणी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच रस्त्याच्या दुतर्फा व वाळू घाटावर झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे. अवैध वाळू वाहतुक रोखण्याकरिता वाळू घाटावर सीसी टीव्ही लावणारे आहे.<br>मा. अध्यक्ष यांनी नमुद केले की, लिलाव झाल्यावर ओव्हर लोडिंग आढळून आल्यास तुम्ही त्याची सूचना देउ शकता. |
| ५ | श्री. जगन्नाथ काकडे, धानोरा<br>अ) पुर्णा नदीमध्ये पाणीपुरवठा करणा-या विहिरी आहे. या विहिरीपासून किती अंतरावर वाळू उपसा करण्यात यावा व वाळू उपसा झाल्याने किती रक्कम गावाला मिळेल. | अ) प्रकल्प प्रतिनिधी डॉ. शुक्ला यांनी सांगितले की, वाळू धोरण नियमातंर्गत पाणीपुरवठा करणा-या विहिरीपासून १०० मीटर अंतरावर वाळू उपसा करण्यात यावा. यासाठी वाळू घाटाचे निश्चीतीकरण |

| | | |
|---|---|---|
| | ब)लिलाव होउन जर अवैध वाळू उपसा होत असेल तर आपल्याकडे काय उपाययोजना आहे. | करताना भुजल विभागाचे अधिकारी तांत्रिक समितीत सदस्य असतात ते याबाबत खात्री करतात.<br>ब) प्रकल्प प्रतिनिधी डॉ. शुक्ला यांनी सांगितले याबद्दल आपण तत्सम तहसिलदार व जिल्हाधिकारी कार्यालय यांना तक्रार देउ शकता व याची शहानिशा होईल. आपण वाळू घाटावर सीसी टीव्ही फुटेजचा आधार घेउ शकता तसेच वाळू वाहतुक करणा-या अधिकृत ट्रॅक्टर ट्रॉलीला रंगीत पटटे मारणार आहोत.<br>मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, अधिकृत वाहनांना शासना मार्फत कुपन देण्यात येतील. कुपन नसलेल्या वाहनांना वाळू वाहतुक करता येणार नाही. वाळू घाटाचे लिलावाआधी व लिलावानंतर अधिकृत मोजमाप करण्यात येईल. |
| ६ | श्री. सोपान थोरे, घारेगांव<br>अ) नदीतून वाळु उपसा करण्याआधी व केल्यानंतर अवैध उत्खननाबाबत पुढील कार्यवाही काय करणार ?<br><br>ब) जर शासकीय दर निश्चीत केले असतील तर संबंधीत ग्रामपंचायतीला देता येणार नाही का ? | अ) मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, लिलाव झाल्यानंतर लिलाव धारकास वाळू घाट हस्तांतर करण्यापुर्वी व्हिडीओ शुटींग करुन वाळू घाटाचे मोजमाप करण्यात येते व नंतरच ताबा दिला जातो.<br>ब) लिलावामध्ये कुणीही भाग घेउ शकतो. |
| ७ | श्री. श्रीकांत म्हस्के, वैजापुर<br>अ) लिलाव झाल्यानंतर नजराणा रक्कम भरली जाते त्यानंतर किती दिवसांनी उर्वरित रक्कम भरणे आवश्यक आहे. | अ) यावर जिल्हा खनिकर्म अधिकारी, औरंगाबाद यांनी सांगितले की यशस्वी लिलाव धारकाने लिलावाच्या मुळ रक्कमेच्या १/४ टक्के रक्कम शासनाकडे भरावी लागते व उर्वरित ३/४ टक्के रक्कम एक महिन्यानंतर भरावी लागते. |

डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, लोक सुनावणी समिती यांनी सांगितले कि जवळपास दिड तास अतिशय चांगली चर्चा झाली यात उपस्थितांनी चांगले प्रश्न मांडले व त्यास प्रकल्प प्रतिनीधी यांनी समर्पक उत्तरे दिली. मा. अध्यक्ष यांनी लिलावा बाबत विस्तृत माहिती दिली व अवैध वाळू उपसा थांबण्याकरिता शासनाचे धोरण व सूचना केली. जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी वाळू लिलावाचे दर निश्चीतीकरण इ. बाबत सखोल माहिती दिली.

श्री. प्रदीप वानखेडे, समन्वयक, लोक सुनावणी यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले कि रेती घाट बाबत कोणाचे काही आक्षेप, टीका-टिपण्णी, तक्रारी असल्यास तसेच आपले मत मांडायचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर, कोणीही म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

श्री. प्रदीप वानखेडे, समन्वयक, लोक सुनावणी यांनी पूर्ण जन सुनावणीचा संक्षिप्तपणे माहिती सांगितली तसेच तांत्रिक सल्लागार यांनी केलेले सादरीकरण व जाहीर लीक सुनावणीवेळी विचारलेले प्रश्न व त्याचे उत्तर ह्या सर्व बाबी ईतिवृत्तांत नमूद करण्यात येऊन पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल व त्यानंतरच सदरील विभागामार्फत पुढील कार्यवाही केली जाईल असे उपस्थितांना कळविले तसेच इतिवृत्ताच्या प्रतींसोबत लोक सुनावणी दरम्यानचे Videos, Photographs, उपस्थिती तक्ता पाठविण्यात येईल असे हि नमूद केले.

मा. अपर जिल्हाधिकारी तथा मा. अध्यक्ष, लोक सुनावणी समिती यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांना कळविले कि, नागरिकांनी मांडलेले अभिप्राय, तक्रारी, सूचना यांची दखल घेण्यात येईल. त्यानंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या / तांत्रिक सल्लागार यांच्या उत्तरांची इतिवृत्तात नोंद घेतली जाईल असे कळविले तसेच मा. न्यायालय यांच्या रेती / वाळू घाट बाबत देण्यात येणाऱ्या आदेशाच्या अधीन राहूनच कार्यवाही केली जाईल असे पुनश्च नमूद केले.

डॉ. राजेश औटी, क्षेत्र अधिकारी यांनी जनसुनावणी समितीचे व उपस्थित असलेल्या ग्रामस्थांचे व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे कामकाज संपन्न झाल्याचे घोषित केली.

| | | |
|---|---|---|
| **(प्रदीप वानखेडे)**<br>समन्वयक, लोक सुनावणी समिती<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | **(डॉ. प्रवीण म. जोशी)**<br>सदस्य, लोक सुनावणी समिती<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, औरंगाबाद | **(डॉ. अनंत गव्हाणे)**<br>अध्यक्ष, लोक सुनावणी समिती<br>तथा<br>अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद |